**पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण**

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक – पिन 422003

दुरध्वनी नंबर 0253-2309700

E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक : २९/०१/२०२५

# जायखेडयात मोटर सायकल चोरी करणारे चोरटे स्थानिक गुन्हे शाखेचे जाळयात चोरीच्या २० मोटर सायकल हस्तगत - नाशिक ग्रामीण पोलीसांची कामगिरी

---

नाशिक ग्रामीण जिल्हयातील मालेगाव शहरासह नजीकचे तालुक्यांमध्ये मोटर सायकल चोरीचे वाढत्या गुन्हयांना प्रतिबंध होण्यासाठी पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी नाउघड गुन्हयांचा आढावा घेवून कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनूषंगाने अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती, उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगाव शहर विभाग श्री. तेघबीर संधु, उपविभागीय पोलीस अधिकारी कॅम्प विभाग श्री. सुरज गुंजाळ, उपविभागीय पोलीस अधिकारी मालेगाव ग्रामीण विभाग श्री. नितीन गणापुरे यांनी मालेगावातील नाउघड मोटर सायकल चोरीचे गुन्हयांतील आरोपींचे सध्याचे वास्तव्याबाबत माहिती घेवून स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सूचना दिल्या होत्या.

त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकातील अधिकारी व अंमलदार हे मालेगाव शहरातील नाउघड मोटर सायकल चोरीचे गुन्हयांचा समांतर तपास करीत असतांना, गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जायखेडा पोलीस ठाणे हद्दीतील वाडीपिसोळी गावात काही संशयीत चोरीच्या मोटर सायकल विक्री करण्याचे उद्देशाने येणार असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्यावरून पोलीस पथकाने वाडीपिसोळी गावातून संशयीत नामे **१) अविनाश वामन सोनवणे,** वय २२, रा. वाडीपिसोळी, ता.सटाणा, जि.नाशिक यास ताब्यात घेतले. त्याचे कब्जात मिळून आलेल्या होंडा शाईन मोटर सायकलचे कागदपत्रांबाबत विचारपुस केली असता, त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. त्यास विश्वासात घेवून सखोल चौकशी केली असता त्याने व त्याचे साथीदार नामे **२) आबा पंडीत खैरणार,** वय ३५, रा. जायखेडा, ता.सटाणा, जि.नाशिक, **३) सतिष चंद्रभान सोनवणे,** वय ३६, रा. वाडीपिसोळ, ता.सटाणा, जि.नाशिक व एक विधीसंघर्षितग्रस्त यांचेसह मिळून सदरची मोटर सायकल जायखेडा गावातुन चोरी केल्याची कबुली दिली आहे.

यातील ताब्यात घेतलेले वरील तीनही संशयीतांकडे मोटर सायकल चोरीचे गुन्हयाचे समांतर तपासात अधिक चौकशी केली असता त्यांनी **जायखेडा, मालेगाव शहर तसेच धुळे जिल्हयातील साक्री तालुक्यातील** खेडोपाडयांमधून एकुण **२० मोटर सायकली चोरी** केल्याची कबुली दिली आहे. सदर आरोपींकडून जप्त केलेल्या चोरीच्या २० मोटर सायकलचे वर्णन खालील प्रमाणे—

| अ. नं | दुचाकी कंपनीचे नाव व मॉडेल | रंग | वाहनाचा चेसीज नंबर | वाहनाचा इंजीन नंबर |
|---|---|---|---|---|
| | बजाज कंपनीची पल्सर 150 | काळे रंगाची | MD2A11CYXLCK52389 | OHYCLK63768 |
| 2. | हिरो कंपनीची स्प्लेन्डर प्लस | काळे रंगाची | MBLHA1CGGHB05889 | HA10ERGBH16015 |
| 3. | होडा कंपनीची शाईन | राखाडी रंगाची | M4GC368AA8168142 | GC36E59548593 |
| 4. | होडा कंपनीची शाईन | राखाडी रंगाची | ME4JC65CFKD022713 | GC65E00076723 |
| 5. | हिरो एच एफ डिलक्स | लाल काळे रंगाची | MBLHAR202HGA05711 | HA11ENHGA05552 |
| 6. | होडा कंपनीची शाईन | राखाडी रंगाची | ME4GC657AG7094454 | GC65E71387862 |
| 7. | हिरो होंडा कंपनीची स्प्लेंन्डर | काळे रंगाची | 97M19F10589 | 97M17E10831 |
| 8. | हिरो होंडा कंपनीची पॅशन | काळे रंगाची | 03M09C31171 | 03M08M32447 |
| 9. | हिरो कंपनीची स्प्लेंन्डर प्लस | निळे काळे रंगाची | MLBHA10EYAHG52904 | HA10EFAHG27934 |
| 10. | हिरो कंपनीची स्प्लेंन्डर प्लस | निळे काळे रंगाची | MBLHA10EE8G06620 | HA10EA8HG15045 |
| 11. | हिरो एच एफ डिलक्स | लाल काळे रंगाची | MBLA11ALE9M00039 | HA11EGE9L61383 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 12. | बजाज कंपनीची प्लाटीना | लाल रंगाची | नंबर खोडलेला आहे | नंबर खोडलेला आहे |
| 13. | हिरो कंपनीची स्प्लेंन्डर प्लस | राखाडी काळे रंगाची | MBLHAW116M5C12097 | HA11EVM5C61099 |
| 14. | हिरो कंपनीची स्प्लेंन्डर प्लस | काळे रंगाची | MBLHAR090HHC3232 | AA10AGHHC75844 |
| 15. | हिरो होंडा स्प्लेंन्डर | राखाडी काळे रंगाची | 06G16010664 | 06G15M11186 |
| 16. | होंडा हॉरनेट | काळे रंगाची | MRHKC121BG8023155 | KC23E80028616 |
| 17. | हिरो स्प्लेंन्डर प्रो | राखाडी रंगाची | 01G20G32748 | नंबर खोडलेला आहे |
| 18. | हिरो कंपनीची स्प्लेंन्डर प्लस | निळे काळे रंगाची | MBLHAR076HHJ09979 | HA10AGHHJ10597 |
| 19. | हिरो होंडा स्प्लेंन्डर प्लस | काळे रंगाची | नंबर खोडलेला आहे | HA10EGB9C21058 |
| 20. | हिरो कंपनीची स्प्लेंन्डर | निळे काळे रंगाची | 04K16F40465 | 04K15C40373 |

यातील आरोपींचे कब्जातुन ***चोरीच्या २० मोटर सायकल व मोबाईल फोन*** असा एकुण ***०७ लाख ८५ हजार रूपये किं.*** चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे. सदर आरोपींना जायखेडा पोलीस ठाणेकडील गुरनं ५३/२०२५ भा.न्या.सं.क. ३०३(२) या गुन्हयात अटक करण्यात आली असून नाशिक ग्रामीण व धुळे जिल्हयातील मोटर सायकल चोरीचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर व अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. राजु सुर्वे, पोउनि दत्ता कांभीरे, पोहवा प्रशांत पाटील, सुधाकर बागुल, सुभाष चोपडा, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने चोरीच्या २० **मोटर सायकल** हस्तगत करून कामगिरी केली आहे.